# ग्रामीण भागांतील मुलांचा बॉक्सिंग खेळात कमी असणारा सहभाग

**भरत रविंद्र कोळी**
आर.सी.पटेल कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग व पॉलिटेक्निक,
शिरपूर (शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक)

## प्रस्तावना

बॉक्सिंग खेळ हा ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत खेळला जाणारा महत्वाचा असा एक खेळ आहे, ज्यात मुहम्म दअली, माईक टायसन, रॉकी मॉर्सिआनो असे अनेक जगप्रसिद्ध बॉक्सर आहेत, त्याचबरोबर मेरी कॉम, लवलीना बोर्गोहेन, निखत झरीन, विजेंदर सिंह, विकास कृष्णन, अमित पंघाल, मनोज कुमार, शिवा थापा अशा अनेक बॉक्सरांनी ऑलिम्पिक, आशियाई व आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्त्व करत नावलौकिक प्राप्त केले आहे आणि या खेळाडूंचा आदर्श पुढे ठेवत अनेक राज्यातील खेळाडूंनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पदके मिळवली आहे आणि हेचं लक्षात घेता भारतात मागील काही काळात बॉक्सिंग खेळाचा आलेख हा आपल्याला उंचावलेला दिसतो, मेरी कॉम सारख्या खेळाडूंमुळे बॉक्सिंग खेळात मुलींचे वाढते प्रमाण हे उल्लेखनीय आहेचं, ग्रामीण भागात ही बॉक्सिंग खेळाचे जाळे जरी विस्तारले असले तरी ग्रामीण भागांतील मुलांचा बॉक्सिंग खेळात कमी असणारा सहभाग हा बोटावर मोजण्या इतकाच आहे.

भारताचे अलिकडच्या २ ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत मिळालेले यश हे संपूर्ण भारतीय क्रीडा विश्वासाठी कौतुकास्पद अशी कामगिरी होती, त्यात २०२४ च्या टोकियो ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत मिळालेलं यश हे ऐतिहासिक ठरले, त्यामुळे एकाअर्थी भारतीय क्रीडा संघटनांना नवसंजिवनी मिळाली, विशेष म्हणजे क्रीडा मंत्रालयाने सकारात्मक भूमिका घेत क्रीडा संघटनांना बऱ्याच प्रमाणात मदतीचा हातभार लावला त्यामुळं संबंधित खेळाच्या क्रीडा संघटनांनी स्वतःच्या खेळांची ध्येय धोरणे नव्याने आखत उद्दिष्टांना पुनरुज्जीवित करत संबंधित खेळ तळागळापर्यंत नेत प्रतिभावंत खेळाडू तयार करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे, याचं दृष्टीने बॉक्सिंग फेडरेशन ऑफ इंडिया व महाराष्ट्र राज्य बॉक्सिंग संघटनेने ही अनेक स्पर्धा शिबिरे

आयोजित उत्कृष्ट बॉक्सिंग खेळाडू घडविण्याचे लक्ष ठेवत ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरीवर लक्ष ठेवले आहे, त्याचं दृष्टीने बॉक्सिंग खेळ कसा तळागळापर्यंत जाईल यावर जरी राज्य व राष्ट्रीय बॉक्सिंग संघटनेने लक्ष केंद्रीत केलं असले तरी बोटावर मोजण्या इतकेचं ग्रामीण भागातून बॉक्सिंग खेळाडू पुढे आले आहेत, खरंतर ग्रामीण भागातील पालकांचा या खेळाकडे बघण्याचा दृष्टीकोन हा मारा–मारीचा खेळ म्हणून पाहिलं जातं, त्यात खेळून पोट भरत नाही हा पुढचा विचार तर ग्रामीण भागातील शाळांमध्ये अशा खेळांना न मिळालेलं व्यासपीठ ही प्रमुख कारण म्हणता येईल म्हणजे अशा शाळांमध्ये शारीरिक शिक्षण आणि क्रीडा याबाबतीत ओसाड भूमिका यामुळेचं ग्रामीण भागात दुर्लक्ष अशा खेळातून खेळाडू पुढं येत नाही, त्यात बॉक्सिंग खेळासाठी सोई – सुविधा (रिंग व साहित्य) उपलब्ध नसणं, प्रशिक्षित प्रशिक्षक नसणं, राज्य राष्ट्रीय स्पर्धेबाबतीत योग्य माहिती न मिळणं, ग्रामीण भागात बॉक्सिंग खेळासंबंधित क्रीडा स्पर्धा न होणं, जिल्हा व राज्य संघटना यांचा आंतरिक वाद, राजकीय हस्तक्षेप, श्रेयवाद यामुळे खेळाडूंना मोठा फटका बसतो, त्याचबरोबर योग्य प्रशिक्षणाचा क्रमवार नसणं, आहार, दुखापत, गेम प्लॅन यासारख्या महत्त्वाच्या गोष्टींन बाबत मार्गदर्शन न होणं, शाळेची खेळाबाबत अतिशय ताठर भूमिका, मुलींच्या पेहरावाबाबत किंवा त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन, परिसरात खेळासंदर्भात नकरात्मकता असणे अशा अनेक बाबी आपणांस सांगता येतील, त्यामुळं गुणवंत खेळाडू सुद्धा अशा खेळाकडे दुर्लक्ष करत वेगळी वाट निवडतात म्हणून ग्रामीण भागात राज्याची लोकसंख्येच्या मानाने पाहिजे तसें बॉक्सिंग खेळाडू ग्रामीण भागातून पुढे येत नाही.

## महत्वाचे मुद्दे :

१) राज्य व जिल्हा संघटना यांचा आंतरिक वाद (पद आर्थिक व्यवहार)

२) जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांचं दुर्लक्ष, शालेय स्पर्धेकरिता पंच मानधन नावाला असणं, खेळाडूंना दिल्या जाणाऱ्या सुविधा कागदावर असणं.

३) आवश्यक अशा सुविधा उपलब्ध नसणं ही मोठी तफावत आहे.

४) संबंधित खेळाबाबत सकारात्मक वातावरण व भूमिका नसणं.

## निष्कर्ष :

ग्रामीण व शहरी भागांतील बॉक्सिंग खेळाचा विचार करता असं लक्षात येतं की ग्रामीण भागात खेळाबाबत नकारात्मकता, उपलब्ध सोई– सुविधा नसणं, संघटना शहरी भागाचा विचार अधिक करत तसं नियोजन आखते यामुळे याचा सर्वसाधारणपणे फटका ग्रामीण भागातील खेळाडूंना बसतो, यामुळेचं ग्रामीण भागातून बॉक्सिंग खेळात कमी सहभाग आपल्याला पाहायला मिळतो.

## संदर्भ सूची :

*बॉक्सिंग संघटनेचा अहवाल*

*स्पोर्ट्सइंजिन प्ले वेबसाईट*

*ब्रिटानिका किड्स अहवाल*

*बॉक्सिंग खेळ अहवाल – ऋषिकेश अहिरे*